# जिल्हाधिकारी नंदुरबार (पुरवठा शाखा)

## - जिल्हा ग्राहक सरंक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य निवडीबाबत जाहिरात -

जिल्हाधिकारी नंदुरबार यांच्याकडुन नंदुरबार जिल्हासाठी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर एकुण 28 अशासकीय सदस्य विभागनिहाय शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार निवडावयाचे आहे. सदस्यांबाबत तपशिल खालील प्रमाणे.

| अ.न. | विभाग निहाय सदस्य | निवड करावयाचे सदस्य संख्या |
|---|---|---|
| क. | जिल्हा परीषद सदस्य | ०२ (महिला राखीव-१) |
| ख. | नगरपरिषदांचे सदस्य | ०२ (महिला राखीव-१) |
| ग. | पंचायत समिती सदस्य | ०२ (महिला राखीव-१) |
| घ. | कृषी उत्पन्न बाजार समिती प्रतिनिधी | ०२ (महिला राखीव-१) |
| ड. | ग्राहक संघटनाचे प्रतिनिधी | १० |
| च. | शाळा/महाविद्यालये प्रतिनिधी | ०२ (महिला राखीव-१) |
| छ. | वैद्यकीय व्यवसायाची प्रतिनिधी | ०२ (महिला राखीव-१) |
| ज. | व्यापार व उघोगक्षेत्र प्रतिनिधी | ०२ |
| झ. | पेट्रोल व गॅस विक्रते प्रतिनिधी | ०२ (महिला राखीव-१) |
| त्र. | शेतक-याचं प्रतिनिधी | ०२ |
| | **एकुण** | **२८** |

जिल्हास्तरीय जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्य निवडीसाठी म.जिल्हाधिकारी सो. नंदुरबार यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. अशासकीय सदस्यांच्या निवडीचे निकष, निवडीची प्रक्रिया याबाबतची सर्व माहिती www.nandurbar.nic.in (नंदुरबार एन.आय.सी.) या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

अर्जाचा नमुना www.nandurbar.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. पात्र संस्था व व्यक्ती यांनी सदरची जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसात अर्ज (दि.- 01 /03 /2018) पर्यत जिल्हाधिकारी, पुरवठा शाखा, नंदुरबार याच्या कार्यालयात समक्ष अथवा पोष्टामार्फत मुदतीत पोहचतील अशा बेताने सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

क्र.2018/पुरवठा/कक्ष-12/ज-11/कावि- 65
नंदुरबार, दिनांक- 23 /0१/२०१८

(डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी)
जिल्हाधिकारी, नंदुरबार

फोटो

## परिशिष्ट —अ

**राज्य ग्राहक संरक्षण परिषद / जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील नियुक्तीसाठी करावयाच्या अर्जाचा नमूना —**

(१) संस्थेचे/अर्जदाराचे पूर्ण नांव -

(२) पूर्ण पत्ता -

(३) संस्थेचा प्रतिनिधी म्हणून ज्या व्यक्तीस नामनिर्देशित करावयाचे आहे त्या व्यक्तीचे नाव व पत्ता –

दूरध्वनी क्रमांक

भ्रमणध्वनी क्रमांक

ईमेल

(४) वय —

(५) शैक्षणिक अर्हता -

(६) व्यवसाय -

(७) प्रवर्ग —

(ज्या प्रवर्गातून नियुक्ती हवी आहे तो प्रवर्ग नमूद करावा.)

(८) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे स्वरुप -

(९) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे कार्यक्षेत्र -

(१०) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचा कालावधी.

केव्हापासून —

केव्हापर्यंत -

(११) किती ग्राहकांमध्ये जागृती निर्माण करण्यात आली व कोणत्या बाबीबद्दल ?

(१२) वरील कार्यामुळे किती ग्राहकांना नेमका काय फायदा प्रत्यक्षात झाला आहे ?

(१३) वरील कार्यात उपलब्धीच्या वैशिष्टयपूर्ण बाबी व त्याकरिता मिळालेले पुरस्कार/ पारितोषिक, इ.

(१४) आपली निवड वरील परिषदेवर झाल्यास आपले काय योगदान राहील व कशाप्रकारे ? (एका परिच्छेदात नमूद करावे.)

(१५) सोबत जोडलेले पुरावे / कागदपत्रे.

---

मी श्री / श्रीमती ........................................... प्रमाणित करतो की, अर्जात नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार खरी व बरोबर आहे. मी आणखी असे मान्य करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास खोटया माहितीच्या आधारे मिळविलेली नियुक्ती रद्द होण्यास व फौजदारी कारवाईस मी पात्र राहीन. त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहाणार नाही.

दिनांक -

अर्जदाराची स्वाक्षरी

स्थळ -

अर्जदाराचे नाव —

## परिशिष्ट-ब

**राज्य/जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील** अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी इच्छुक व्यक्ती/संस्थांनी खालील प्रमाणपत्रे/कागदपत्रे जोडून अर्ज सादर करणे आवश्यक आहे:-

**अ) अशासकीय संस्थेकडून नामनिर्देशित करावयाच्या प्रतिनिधींसाठी:-**

१) विहित नमुन्यातील अर्ज.

२) अर्जासोबत अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींसाठी शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या निकषांच्या अनुषंगाने केलेल्या कामाचा पुरावा म्हणून सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे..

३) गैरवर्तनासंबंधी संस्थेविरुध्द/पदाधिका-यांविरुध्द खटला दाखल होऊन शिक्षा झाली नसल्याचे संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त यांचे किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिका-याचे प्रमाणपत्र.

४) शासनाने बंदी घातलेल्या संस्था / संघटना यांच्याशी संबंधित नसल्याबद्दल जिल्हा पोलीस अधिक्षक / पोलीस आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिका-यांचे प्रमाणपत्र

५) संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत संस्थेची नोंदणी झाली असल्याचे प्रमाणपत्र व घटनेची प्रत.

६) संस्थेचे ध्येय व उद्देश.

७) संस्थेचे बँक बॅलन्स प्रमाणपत्र.

८) संस्थेचा चालू वर्षाचा अर्थसंकल्प.

९) संस्थेचे मागील तीन वर्षांचे ऑडिटेड स्टेटमेंट.

१०) संस्थेने ज्या व्यक्तीची शिफारस केली आहे, त्या व्यक्तीचे संमतीपत्र.

**ब) इतर अशासकीय सदस्यासाठी:-**

१) विहित नमुन्यातील अर्ज.

२) अर्जासोबत संबंधित व्यक्तीने ज्या प्रवर्गातील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीकरिता अर्ज केला आहे, त्यासाठी विहित केलेल्या निकषांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने केलेल्या कामाचा पुरावा म्हणून सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडाव्यात.

३) गैरवर्तनासंबंधी खटला किंवा शिक्षा झाली नसल्याचे संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त यांचे किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिका-याचे प्रमाणपत्र.